# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेसनोट क्रमांक ३०७/२०२४ दिनांक- १७/०८/२०२४.

## "नवघर पोलीस ठाणे हद्दीतील मागील काही दिवसापासुन चोरीचे दाखल गुन्हयातील आरोपीस अटक करुन गुन्हे उघडकीस आणण्यास गुन्हे प्रकटिकरण पथकास यश"

नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ४५७/२०२४ बि.एन.एस कलम ३०३ (२) दि.१४.०८.२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. नमुद गुन्हयातील फिर्यादी श्री सोहेल जमरुद्दीन खान, व्यवसाय- रिक्षा चालक, रा. रुम. नं.७०३, शक्ती टॉवर, क्विन्स पार्क, रामदेव पार्क, भाईंदर पुर्व. ता.जि.ठाणे हे रिक्षा चालक असुन ते रिक्षा क्र-MH-47 AJ-8946 ही चालवतात. दि.१२/०८/२०२४ रोजी दिवसभर फिरवुन सायंकाळी-०६.०० वा.चे सुमारास क्विन्स पार्क, मदिना मस्जिद समोरील रोडवर, भाईदर पुर्व. ता.जि.ठाणे येथे पार्क केली. त्यानंतर ते त्यांचा राहते घरी निघुन गेले. दुस-या दिवशी दि.१३/०८/२०२४ रोजी रात्रौ ०३.०० वा फिर्यादी हे पुन्हा रिक्षा चालवण्यासाठी त्यांची रिक्षा घेण्यासाठी घटनास्थळावर गेले असता त्यांची रिक्षा त्यांना पार्क केलेल्या ठिकाणी मिळुन आली नाही. त्यावेळी त्यांनी त्यांचा रिक्षाचा राहते परिसरात शोध घेतला मात्र त्यांची रिक्षा त्यांना कोठेही मिळुन आली नाही. त्यानंतर फिर्यादी यांची रिक्षा चोरी झाल्याबाबत खात्री झाल्याने त्यांनी पोलीस ठाणेस येवुन तक्रार दिल्याने वर नमुदप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नवघर पोलीस ठाणे हददीत मागील काही दिवसांपासुन चोरीचे गुन्हे होत होते. सदरची बाब ही गंभीर असल्याचे लक्षात घेवुन पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, सहाय्यक पोलीस आयुक्त, नवघर विभाग तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे नमुद गुन्हयातील घटनास्थळावरुन व घटनास्थळाचे आजुबाजुवरुन प्राप्त केलेले सीसीटीव्ही कॅमेरांचे फुटेज यांची पडताळणी केली असता गुन्हयातील संशयित आरोपी हा रिक्षा चोरीचे गुन्हा करत असल्याचे निष्पन्न झाले होते. गुन्हयातील घटनास्थळावर प्राप्त केलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये संशईत आरोपी हा नयानगर पोलीस ठाणे रेकॉर्डवरील आरोपी मोहम्मद मजहर रफीक खान, धंदा-इव्हेन्ट लाईन, रा. सी विंग ३०१, चन्द्रेश अभिषेक नयानगर, लोढा रोड, मिरारोड पूर्व, ता.जि.ठाणे हा असल्याचे निष्पन्न झाले होते. त्याअनुशंगाने आरोपी याचा मोबाईल नंबर प्राप्त करुन त्याचे मोबाईल नंबरचे तांत्रिक विश्लेषण करुन त्यास मिरारोड रेल्वे स्टेशन परिसर येथुन सापळा रचुन ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी याचा साथीदार इकबाल इस्त्राईल खान, वय २२ वर्षे, धंदा-कंत्राटदार, पत्ता- चंन्द्रेश अभिषेक सोसायटीमधील झोपडा, नयानगर, लोढा रोड, मिरा रोड पूर्व,ता.जि.ठाणे यास अटक करण्यात आली असुन आरोपी यांचे ताब्यातुन फिर्यादी यांची चोरी केलेली रिक्षा क्र-MH-47 AJ-8946 हस्तगत करण्यात आली आहे. सदर गुन्हयातील आरोपी क्र-०१ मोहम्मद मजहर रफीक खान याचे विरोधात नयानगर पोलीस ठाण्यात खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहे.

१) नयानगर पोलीस ठाणे गुरक्र-१९७/२०१९ भादविस कलम ३७९ प्रमाणे
२) नयानगर पोलीस ठाणे गुरक्र-१६२/२०२१ भादविस कलम ३७९ प्रमाणे
३) नयानगर पोलीस ठाणे गुरक्र-४८०/२०२१ भादविस कलम ३७९ प्रमाणे
४) नयानगर पोलीस ठाणे गुरक्र-८१५/२०२० भादविस कलम ३७९ प्रमाणे
५) नयानगर पोलीस ठाणे गुरक्र-१८२/२०२३ भादविस कलम ३७९ प्रमाणे

सदरची कामगिरी श्री. मधुकर पांण्डेय, पोलीस आयुक्त, मि.भा-व.वि.पोलीस आयुक्तालय, श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, श्री.राजेंद्र मोकाशी सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचा मार्गदर्शनाखाली धिरज कोळी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) अशोक कांबळे, सपोनि/अमोल तळेकर, पोउनि-ज्ञानेश्वर आसबे, पोहवा/भुषण पाटील, संतोष पाटील, सुरेश चव्हाण, नवनाथ घुगे, जयप्रकाश जाधव, पोशि/ओंकार यादव, सुरजसिंग घुनावत, संकेत मगर, अस्वर, पवार तसेच मसुब/कुणाल हिवाळे यांनी केलेली आहे.

**-------------0000--------------**